# कोजागिरी पौर्णिमेचे महत्त्व

हिंदू धर्मात शरद पौर्णिमा सणाला विशेष महत्त्व आहे. हिंदू कॅलेंडरनुसार, यावर्षी शरद पौर्णिमा २८ ऑक्टोबर रोजी साजरी केली जाईल. पौराणिक मान्यता आहे की या दिवशी चंद्र १६ चरणांनी भरलेला असतो. शरद पौर्णिमेला पूनम पौर्णिमा आणि कोजागिरी पौर्णिमा असेही म्हणतात. हिंदू धर्मशास्त्रात कोजागिरी पौर्णिमेचं महत्त्व सांगितलं गेलं. या दिवशी चंद्र पृथ्वीच्या सर्वात जवळ असतो. या दिवशी देवी लक्ष्मीचा पृथ्वीतलावर वास असतो असं सांगितलं जातं. तर चंद्रापासून निघणाऱ्या शीतल किरणोत्सर्गामुळे त्याचं महत्त्व आणखी अधोरेखित होतं.

हिंदू कॅलेंडरनुसार, या वर्षी शरद पौर्णिमा बुधवार, १६ ऑक्टोबर रोजी रात्री ०८.४१ वाजता सुरू होईल आणि गुरुवार, १७ ऑक्टोबर रोजी सायं. ०४.४६ वाजता समाप्त होईल. शरद पौर्णिमेच्या रात्री देवी लक्ष्मी पृथ्वीवर विहार करते आणि ज्या घरांमध्ये प्रकाश आणि स्वच्छता असते त्या घरांवर आपला आशीर्वाद असतो, अशी धार्मिक मान्यता आहे. यामुळेच शरद पौर्णिमेच्या रात्री लोक आपल्या घराचे दरवाजे उघडे ठेवतात.



दरवर्षी दीपावलीच्या अवघ्या १५ दिवस आधी शरद पौर्णिमा देवी लक्ष्मीला प्रसन्न करण्यासाठी येते. यंदा शरद पौर्णिमा ९ ऑक्टोबर, रविवारी आहे. पौराणिक मान्यतेनुसार अश्विन महिन्यातील पौर्णिमा तिथीला कोजागरी आणि शरद पौर्णिमा म्हणतात. शास्त्रांमध्ये शरद पौर्णिमेचा संबंध लक्ष्मीच्या जन्मापासून ते भगवान श्रीकृष्णाच्या महारास पर्यंत असल्याचे मानले जाते.

या दिवशी दम्यावरचे आयुर्वेदिक औषध घेण्याची पद्धत आहे. या दिवशी घेतलेले औषध लवकर लागू पडते असा समज आहे. ह्या दिवशी पाळावयाच्या व्रताला 'कोजागरव्रत' म्हणतात. दिवसा उपवास करून रात्री लक्ष्मी व ऐरावतारूढ इंद्र यांची पूजा करावी. या पूजेनंतर रात्री चंद्राला आटीव दूधाचा नैवेद्य दाखवायचा असतो. दूध आटवून त्यात केशर, पिस्ते, बदाम, चारोळ्या, वेलदोडे, जायफळ वगैरे गोष्टी घालून, तसेच साखर घालून, नैवेद्य दाखविला जातो.

देव व पितर यांना नारळाचे पाणी व पोहे समर्पण करावेत तसेच ते आप्तेष्टांसह स्वतःही सेवन करावेत. दुधात मध्यरात्री पूर्ण चंद्राची किरणे पडू देतात आणि ते दूध मग प्राशन केले जाते. उत्तररात्रीपर्यंत जागरण केले जाते. अशी आख्यायिका सांगतात की या दिवशी उत्तररात्री साक्षात लक्ष्मी चंद्रमंडळातून पृथ्वीवर उतरते व लक्ष्मीदेवी येऊन (संस्कृतमध्ये) 'को जागर्ति' (म्हणजे 'कोण जागत आहे') असे विचारते, म्हणून या दिवसाला 'कोजागरी पौर्णिमा' म्हणतात. या दिवशी द्यूत खेळावे, असेही सांगितले आहे. लक्ष्मीच्या स्वागतार्थ रात्री रस्ते, घरे, मंदिरे, उद्याने, घाट इ. ठिकाणी असंख्य दीप लावावेत.

या दिवशी विधीपूर्वक स्नान करून उपास ठेवावा. काही लोक तांब्याच्या किंवा मातीच्या कलश्यावर वस्त्राने झाकलेली सोन्याची लक्ष्मीची मूर्ती किंवा प्रतिमा स्थापित करून पूजा करतात. संध्याकाळी चंद्रोदय झाल्यावर सोने, चांदी किंवा मातीचे तुपाने भरलेले १०० दिवे लावतात. देवीला नैवैद्य दाखविला जातो. तूप घातलेली खीर तयार करावी व बऱ्याच पात्रात भरून ती चंद्र किरणांखाली ठेवावी. तीन तासानंतर संपूर्ण खीर लक्ष्मीला अर्पित करून ब्राह्मणांना प्रसाद म्हणून वाढावी. त्याबरोबर मांगल्यमय गाणी म्हणून, भजने म्हणत रात्री जागरण करावे.

कोजागरी पौर्णिमेच्या मध्यरात्री देवी महालक्ष्मी आपल्या कर कमलांमध्ये वर आणि अभय घेऊन भाविकतेने आपले व्रत करणाऱ्याला प्रसन्न होते. जो मनुष्य जागून माझी पूजा करत असेल त्याला मी अपार अपार धन-धान्य देईन, असे ती म्हणते. दरवर्षी करण्यात येणारे हे व्रत लक्ष्मीला संतुष्ट करण्यासाठी केले जाते. त्याने लक्ष्मी प्रसन्न होऊन समृद्धी लाभतेच पण मृत्यूनंतर परलोकातही सद्गती मिळते. असे मानले जाते की शरद पौर्णिमेच्या रात्री देवी लक्ष्मी सर्वाधिक प्रसन्न होते आणि देवाच्या जगातून पृथ्वीला भेट देण्यासाठी येते. जे भक्त शरद पौर्णिमेला रात्री जागरण करून तिची पूजा करतात, त्यांना लक्ष्मी देवीच्या कृपेने धन आणि वैभव प्राप्त होते.

या दिवशी प्रत्येक कुटुंबातील ज्येष्ठ अपत्याला ओवाळून त्याची किंवा तिची 'आश्विनी' साजरी करतात. शरद पौर्णिमेच्या रात्री लोकं चंद्राच्या प्रकाशात दूध आटवतात आणि रात्री खुल्या आकाशाखाली ठेवतात. त्यानंतर ते दुसऱ्या दिवशीसुद्धा सेवन करतात. या दिवशी चंद्राच्या किरणांमुळे अमृतवृष्टी होते आणि चंद्रप्रकाशात खीर ठेवल्याने ती अमृतसारखी होते, अशी धार्मिक श्रद्धा आहे.

हिवाळ्यात गरम दूध पिणे आरोग्यासाठी चांगले मानले जाते. या दिवशी चुकूनही मद्याचे सेवन करू नये. तो अशुभ मानला जातो.

शरद पौर्णिमेच्या दिवशी चुकूनही पैशाचे व्यवहार करू नयेत. या दिवशी कोणत्याही व्यक्तीला कर्ज दिल्यास लक्ष्मीचा कोप होतो. शरद पौर्णिमेच्या दिवशी सवाश्न महिला घरी आल्यास तिला रिकाम्या हाताने परत जाऊ देवू नये. शक्य झाल्यास त्यांची ओटी भरावी.

असे म्हटले जाते की, पृथ्वीवर विहार करताना देवी लक्ष्मी देखील पाहते की कोण जागृत आहे आणि तिची पूजा करत आहे. म्हणूनच याला कोजागरी पौर्णिमा असे म्हणतात. या रात्री लक्ष्मीची पूजा केल्याने ऋणातून मुक्ती मिळते. या रात्री खीर बनवल्यानंतर देवी लक्ष्मीला अर्पण करून श्री सूक्त, कनकधारा स्तोत्र, विष्णु सहस्त्रनामाचा जप आणि श्रीकृष्णाच्या मधुराष्टकमचा पाठ करा. असे केल्याने कर्जातून लवकर सुटका होऊ शकते.

समुद्रमंथनाने तयार होणारे पांढरे शंख लक्ष्मीला अतिशय प्रिय मानले जातात. कोजागरी पौर्णिमेच्या दिवशी संध्याकाळी लक्ष्मी देवीच्या पूजेमध्ये ५ पांढरी शंख लाल कपड्यात बांधून ठेवा आणि पूजेनंतर ही शंख आपल्या धन ज्या ठिकाणी ठेवतात तिथे ठेवा. लक्ष्मी मातेचा आशीर्वाद तुमच्या घरावर सदैव राहील.

लक्ष्मी देवीला पान अतिशय प्रिय मानले जाते. शरद पौर्णिमेच्या दिवशी पूजेत लक्ष्मी देवीला पान अर्पण करावे आणि स्वतःही सेवन करावे. शास्त्रामध्ये पान हे समृद्धीचे प्रतीक मानले गेले आहे.

लक्ष्मी देवीला सुपारी अर्पण करा आणि घरातील सर्व सदस्यांना प्रसाद म्हणून वाटा.तुळशीला देवी लक्ष्मीचे रूप देखील मानले जाते आणि शरद पौर्णिमेला तुळशीची पूजा करणे खूप शुभ आहे. ज्या घरामध्ये तुळशीची नित्य पूजा केली जाते त्या घरातील लोकांवर माता लक्ष्मी नेहमी प्रसन्न राहते. शरद पौर्णिमेच्या दिवशी तुळशी जवळ तुपाचा दिवा ठेवा आणि सौभाग्याचं लेणं अर्पण करा. दुसऱ्या दिवशी या वस्तू एखाद्या गरजू विवाहित महिलेला दान करा.

# सुख शांती समाधान

## काळा धागा का बांधावा?

**काही लोकं त्यांच्या पायाला आणि हाताला काळा धागा बांधतात. काही लोकांना असे वाटते की, फॅशन म्हणून काळा धागा बांधला जातो. मात्र काळा धागा ही फॅशन नसून तो दृष्ट नजरेपासून बचावासाठी पायाला बांधला जाते. याशिवाय काळ्या धाग्यामुळे अनेक फायदे होतात. जाणकार सांगतात की, काळा धागा धारण केल्याने पत्रिकेतील शनी बलवान होतो आणि शनिदोषापासून मुक्ती मिळते. मात्र यासाठी काही नियमही पाळणे आवश्यक आहे.**

एकदा घातलेला काळा दोरा जोवर खराब होऊन तुटत नाही किंवा निघत नाही तोपर्यंत तो घालता येऊ शकतो.

लहान मुलांना दृष्ट लागू नये यासाठी काळा दोरा बांधला जातो. मुलांच्या कमरेवर किंवा हातावर हा काळा दोरा बांधण्याची प्रथा आहे. लहान मुलांना खूप लवकर दृष्ट लागते, म्हणून त्यांच्या गळ्यात, हातात काळा दोरा बांधला जातो. काळ्या दोऱ्यामुळे वाईट शक्ती लांब राहतात. तसंच आरोग्यही चांगलं राहतं, अशी श्रद्धा आहे. आता तरुणांमध्ये काळा धागा बांधण्याची फॅशन आली आहे. फॅशन म्हणून हा धागा चक्क पायालाही बांधला जातो. हिंदू धर्मानुसार, काळा धागा विशिष्ट अवयवालाच बांधला गेला पाहिजे.

जर तुम्हाला कोणत्याही आजाराचा सामना करावा लागत असेल तर काळा धागा जरूर घाला. असे मानले जाते की ते सर्व प्रकारचे रोग बरे होण्यास मदत होते.

जर तुम्ही तुमच्या हातावर किंवा पायावर काळा धागा बांधत असाल तर तुम्ही ज्योतिषाचा सल्ला घ्यावा.



काळा धागा धारण करताना रुद्र गायत्री मंत्राचा खऱ्या मनाने जप करा, 'ओम तत्पुरुषाय विद्महे महादेवाय धीमहि तन्नो रुद्रः प्रचोदयात्' नामजप विशेष लाभदायक आहे.

पुरुषांनी उजव्या हाताला आणि पायाला काळ्या रंगाचा धागा बांधणे शुभ मानले जाते. त्याचबरोबर महिलांनी डाव्या हाताला व पायाला धारण करणे फायदेशीर ठरते. काळा धागा गळ्यात घालायचा असेल, तर तो नुसताच घालू नये. त्यात एखादं रत्न किंवा चांदीचं लॉकेट घालावं.

काळा धागा कमरेवर बांधणं सर्वोत्तम समजलं जातं. भगवान श्रीकृष्णही कमरेवरच काळा धागा बांधत असत. यामुळे आरोग्य उत्तम राहतं. आजारांपासून संरक्षण होतं. विशेषतः पाठीचा कणा चांगला राहतो. मणक्याचे विकार होत नाहीत. ज्यांच्या पत्रिकेत शनी ग्रहाची स्थिती चांगली नाही, त्यांनी कमरेवर काळा धागा बांधावा. पत्रिकेतली शनीची स्थिती चांगली असेल तर जीवनात प्रगती होते.

कमरेवर किंवा गळ्यात काळा धागा घालायचा असेल तर एखाद्या शनिमंदिरात जाऊन देवाच्या पायाशी तो धागा लावून आणावा. हनुमान मंदिरात किंवा भैरवनाथ मंदिरातही जाऊन हे करता येऊ शकतं. मंदिरातल्या त्या त्या देवाचं नामस्मरण करून मग धागा बांधावा. असा धागा खूप चमत्कारिक लाभ मिळवून देतो. शनीची कृपादृष्टी राहते. हातात



लाल दोरा किंवा लाल-पिवळा मौलीचा दोरा बांधला असेल तर मात्र त्यासोबत काळा दोरा बांधू नका. एकदा घातलेला काळा दोरा जोवर खराब होऊन तुटत नाही किंवा निघत नाही तोपर्यंत तो घालता येऊ शकतो. स्वतःहून तो तोडण्याचा किंवा काढण्याचा प्रयत्न करू नका. समजा, निघाला तर तो पिंपळाच्या झाडाजवळ ठेवून द्या. काळा धागा कोणीही घालू शकतो. त्याचे अनेक उपयोग आहेत.

# रॅगिंग विरोधी तक्रार करणाऱ्या विद्यार्थ्याच्या निलंबनाला स्थगिती

गुजरात हायकोर्टाचा निर्णय

■ अहमदाबाद

**गुजरात** उच्च न्यायालयाने रॅगिंग विरोधी तक्रार करणाऱ्या गुजरात नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीच्या एका विद्यार्थ्याच्या निलंबनाला स्थगिती दिली आहे. गौरव मीना असे या विद्यार्थ्याचे नाव आहे.

गौरव मीना या विद्यार्थ्याला २१ सप्टेंबर रोजी युनिव्हर्सिटी व्यवस्थापनाने वसतिगृहाची खोली रिकामी करण्याचे निर्देश दिले होते. या निर्णयाला गौरवने गुजरात उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.या त्याच्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती अनिरुद्ध पी.मायी यांनी गौरव मीना याच्या निलंबनाला स्थगिती दिली. त्याला तत्काळ त्याच्या वसतिगृहातील खोलीत पुन्हा प्रवेश देण्याचे आदेश दिले. दरम्यान,मीना याने रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थ्यांविरोधात युनिव्हर्सिटी व्यवस्थापनाकडे तक्रार दाखल केल्यानंतर त्या विद्यार्थ्यांनी मीनाची माफी मागायचे निर्देश चौकशी समितीने दिले होते. पण त्या विद्यार्थ्यांने माफी मागितली नाही. म्हणून मीना याने पुन्हा तक्रार केली. त्यानंतर मीना यालाही शिस्तपालन समितीने मीना यालाही चौकशीसाठी बोलावले होते. पण चाचणी परीक्षा असल्यामुळे तो हजर राहू शकला नाही. या कारणावरून मीनाचे निलंबन करण्यात आले होते.

# मराठवाड्यातील ६ जागा सोडा! मुस्लिमांची पवारांकडे मागणी

■ पाथरी

**गेल्या** लोकसभा निवडणुकीत सक्षमपणे साथ दिल्यामुळे मुस्लीम समाजासाठी पाथरी विधानसभा मतदारसंघासह मराठवाड्यातील ६ मतदारसंघ सोडावेत, अशी मागणी पाथरीतील शरद पवार गटाच्या अल्पसंख्याक शिष्टमंडळाने राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्याकडे केली. शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत झालेल्या कार्यक्रमात हे शिष्टमंडळ आले होते. त्यावेळी या शिष्टमंडळाने शरद पवार यांना निवेदन दिले. या निवेदनात म्हटले की, लोकसभा निवडणुकीत मुस्लीम समाजाने महाविकास आघाडीला बिनशर्त पाठिंबा दिला आहे. त्यामुळे आता विधानसभा निवडणुकीत मुस्लीम समाजातील इच्छुक उमेदवारांना संधी द्यावी.


## ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक बांधकाम विभाग

निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील " दवाखाना बांधणे " या लेखाशिर्षका अंतर्गत लोकमान्य-सावरकरनगर प्रभाग समिती क्षेत्रातील प्र.क्र.१३ मधील काजूवाडी येथील आरोग्यकेंद्राचे नूतनीकरण करणे या कामाकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा प्रक्रियेमध्ये ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक संस्था, महानगर पालिका ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत/ काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे अथवा प्रस्तावित आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. सविस्तर निविदा सुचना व प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर दि. १४.१०.२०२४ ते दि. २१.१०.२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे वर दि. २१.१०.२०२४ रोजी पर्यंत सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यांत येतील.सदर निविदा दि. २३.१०.२०२४ सायं. १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघड्यात येतील. कोणतीही एक अथवा सर्व निविदा प्रपत्रके कारणे न दाखविता नाकारण्याचा अधिकार नगर अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-लो.सा प्र.स/७७१/२०२४-२५ सही/-
दि:११.१०.२०२४ कार्यकारी अभियंता
Pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका, ठाणे
www.thanecity.gov.in



## ठाणे महानगरपालिका, ठाणे

राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय
छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय
**द्वितीय मुदतवाढ निविदा सूचना**

ठाणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयासाठी ठामपा/ पिआरओ/अधिष्ठाता/ ४१२/२०२४-२५ दि:०२/०९/२०२४ अस्थिव्यंग चिकित्सा विभागासाठी OT TABLE उपकरण खरेदी करणेसाठी ऑन लाईन ई-टेडरिंग पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. दरम्यानच्या कालावधीत सदर निविदेस द्वितीय मुदतवाढ देण्यात येत आहे. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in दि. १४/१०/२०२४ ते दि.२२/१०/२०२४ रोजी पर्यंत १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील. दि.२२/१०/२०२४ रोजी १६.३० वाजेपर्यंत ऑनलाइन निविदा स्वीकारण्यात येतील. दि.२५/ १०/२०२४ रोजी १६.०० वाजता स्वीकारलेल्या निविदा ऑनलाइन उघडण्यात येतील.

ठामपा /पिआरओ/अधिष्ठाता/७६१/२०२४-२५ सही/-
दि.११.१०.२०२४ अधिष्ठाता
plsvisitourofficialweb-site छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय व
www.thanecity.gov.in राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय


# प्रागतिक पक्षांचा पर्याय नाशिकला राज्यव्यापी परिषद

■ मुंबई

**आज** महाराष्ट्रातील प्रागतिक पक्षांच्या मुंबईत भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयात झालेल्या संयुक्त बैठकीत येत्या बुधवार, १६ ऑक्टोबर रोजी नाशिक येथे भव्य राज्यव्यापी परिषद आयोजित करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्रभरातून हजारों लोक या परिषदेत सहभागी होतील.

नाशिकच्या ह्या परिषदेत येत्या विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीने पर्यायी जनताभिमुख

**हजारों लोक परिषदेत सहभागी होतील**

धोरणे जाहीर करावीत आणि प्रागतिक पक्षांसोबत जागा वाटपाबाबत सन्मानपूर्वक तडजोड करावी अशी आग्रही मागणी करण्यात येईल. महाविकास आघाडीच्या नेतृत्वासोबत चर्चा करण्यासाठी माजी आमदार जयंत पाटील, आमदार अबू असीम आझमी, डॉ. अशोक ढवळे व डॉ. भालचंद्र कानगो या चार सदस्यांच्या समितीची नेमणूक करण्यात आली. या बैठकीत शेतकरी कामगार पक्षातर्फे माजी आमदार जयंत पाटील, प्रा. एस. व्ही. जाधव व राजेंद्र कोरडे, समाजवादी पक्षातर्फे मेराज सिद्दीकी व राहुल गायकवाड, भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे डॉ. भालचंद्र कानगो, सुभाष लांडे, राजू देसले, प्रा. राम बाहेती, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातर्फे डॉ. अशोक ढवळे, किसन गुजर, डॉ. एस. के. रेगे, शैलेंद्र कांबळे आणि सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षातर्फे किशोर ढमाले हजर होते.

# पिंपरीत दुचाकी झाडावर आदळून २ इंजिनिअरचा मृत्यू

■ पुणे

**हिंजवडी** येथे भरधाव दुचाकीची झाडाला धडक बसल्याने दोन तरुणांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहे. सौरभ यादव (२७) आणि अनुराग पांडे (२७) अशी मृत्यू झालेल्या दोघांची नावे आहेत. सौरव हिंजवडी आयटी पार्कमधील एका कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर होता. अनुराग हैदराबाद येथे सॉफ्टवेअर इंजिनिअर होता.

सौरभ दुचाकीवरुन अनुरागला घेऊन हिंजवडी चौकातून फेज वन सर्कलकडे जात होता. इंडियन थाळी हॉटेलसमोरील फूटपाथवर असलेल्या झाडाला सौरभच्या दुचाकीची जोरदार धडक बसली. त्यात सौरभ आणि अनुराग पांडे या दोघांचाही मृत्यू झाला.

# नागपुरातील ज्येष्ठ लेखक भालचंद्र देशपांडे यांचे निधन

■ नागपूर

**नागपूरच्या** द्रोणाचार्य नगरातील ज्येष्ठ लेखक भालचंद्र देशपांडे यांचे आज सकाळी निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर अंबाझरी घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी वृंदा, मुलगा श्रीकांत, सून अंजली, मुलगी प्रतिमा भोपळे, जावई डॉ. संजीव भोपळे, नातवंड व बराच आप्त परिवार आहे. बुलडाण्यातील माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयातून ते प्राचार्य पदावरून सेवानिवृत्त झाले होते.

अनेक नामवंत मासिके, नियतकालिके आणि दिवाळी अंकांमध्ये त्यांनी कथा, शैक्षणिक व वैचारिक लेख असे विपुल लेखन केले. आकाशवाणीवर त्यांची अनेक बालनाट्ये व नभोनाट्ये प्रसारित झाली. त्यांचे अनेक कादंबरी, बालकथा संग्रह प्रकाशित झाले होते. त्यांच्या साहित्याला अनेक पुरस्कारही मिळाले होते.


## महाराष्ट्र शासन, गृह विभाग (बंदरे व परिवहन)
## महाराष्ट्र सागरी मंडळ

इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, दुसरा मजला, १४ रामजीभाई कमानी मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६९०४१७७७ फॅक्स क्र. ०२२-६९०४१७४०
**Website :** https://mahammb.maharashtra.gov.in **Email:** ceo.mmb@maharashtra.gov.in/ceommb@gmail.com

**द्वितीय ई- निविदा सूचना (सन २०२४-२५)**
**Main Portal : https://mahatenders.gov.in**

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व योग्य अनुभव असलेल्या इच्छुक उमेदवार यांच्या करीता खाली नमूद केलेल्या कामांसाठी बी-१ नमुन्यात मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाच्या निविदेची अंदाजित किंमत (रु.) | इसारा रक्कम (रु.) | कोऱ्या निविदेची किंमत (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी (महिन्यात) |
|---|---|---|---|---|---|
| १. | मनोरी, ता. बोरीवली, जि. मुंबई उपनगर येथील समुद्रकिनाऱ्या समोरील दिपस्तंभ / वॉचटॉवरचे मजबुतीकरण करणे. | २,१०,०९,७१५/- | १५,००,०००/- | २३६०/- | १२ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| २. | चेंबुर विधानसभेतील माहुल गावातील मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवाच्या बोटी व होड्या समुद्रात जाण्यायेण्यासाठी विकासकामे करणे. | ८३,०२,८१५/- | ८३,५००/- | १,१८०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ३. | बांद्रा बॅन्डस्टॅंड प्रोमिनोड उत्तर बाजुकडे सौरदिव्यांचे खांब बसविणे ता. अंधेरी, जि. मुंबई उपनगर. | ८०,९८,८३२/- | ८१,०००/- | १,१८०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ४. | बांद्रा बॅन्डस्टॅंड प्रोमिनोड दक्षिण बाजुकडे सुशोभित सौरदिव्याचे खांब बसविणे ता. अंधेरी, जि. मुंबई उपनगर | ७८,०९,५८८/- | ७८,५००/- | १,१८०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ५. | गोराई कोळीवाडा जेट्टी व मनोरी कोळीवाडा येथे सौरदिव्याचे खांब बसविणे, ता. बोरीवली जि. मुंबई उपनगर | ७१,७५,६३०/- | ७२,०००/- | १,१८०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ६. | कार्टर रोड प्रोमिनाड, बांद्रा, ता, अंधेरी, जि. मुंबई उपनगर येथे स्टेनलेस स्टिल रेलींग बसविणे, आवार भिंतीची उंची वाढविणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | ६२.९०.६१३/- | ६३,५००/- | १,१८०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ७. | मांडवी गल्ली प्रवासी जेट्टी, वर्सोवा, ता. अंधेरी, जिल्हा मुंबई उपनगर येथील वाहनतळाला इपॉक्सी पॅट करणे, कुंपण घालणे व वाहनतळाची अतिरिक्त जागा तयार करणे. | २१.४७,११०/- | २१,५००/- | ५९०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |

तपशिलवार अटी व शर्ती पाहण्यासाठी तसेच कोरा निविदा फॉर्म डाऊनलोड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक **१४.१०.२०२४ रोजी १२.००** वा. ते दिनांक **१३.११.२०२४ रोजी १७.०० वा.** पर्यंत उपलब्ध असतील.

कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

**सही/-**
**(तुषार पाटोळे)**
**कार्यकारी अभियंता,**
**महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई.**

क्रमांकः आरओसी-२०२४-२५/क्र.५/सी४४६२



## अर्शिया लिमिटेडकरिता दि. २७ सप्टेंबर, २०२४ रोजी प्रसिद्ध स्वारस्य अभिव्यक्ती (फॉर्म-जी) चे शुद्धीपत्रक

फायनान्शियल एक्सप्रेस (संपूर्ण भारत आवृत्ती); नवाकाळ (मुंबई आवृत्ती) आणि शाह टाईम्स ( खुरजा, जि. बुलंदशहर समाविष्ट असलेली मेरठ आवृत्ती) मध्ये दिनांक २७ सप्टेंबर, २०२४ रोजी प्रसिद्ध झालेल्या अर्शिया लिमिटेडकरिता नादारी आणि दिवाळखोरीपणा (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए (१) अन्वये स्वारस्य अभिव्यक्ती (ईओआय) करिता आमंत्रण जाहिरातीच्या संदर्भात, ज्यामध्ये ईओआय सादरीकरणाकरिता अंतिम दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ होती, धनको समितीच्या मंजुरीच्या अनुषंगाने याद्वारे असे निर्देशित करण्यात येते की, संभाव्य ठराव अर्जदारा (रां) च्या व्यापक सहभागाकरिता ईओआय सादरीकरणाकरिता अंतिम दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ पर्यंत वाढविण्यात येत आहे. ईओआयचे निर्धारित वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे:

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव व पॅन / सीआयएन / एलएलपी क्र. | अर्शिया लिमिटेड<br>पॅनः AAACI2679A<br>सीआयएनः L9000MH1981PL024747 |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | नोंद. कार्या.: अर्शिया एफटीडब्ल्यूझेड, सीओ-१, सर्व्हे क्र. १७८/३ आणि १७८/४, मु. पोस्ट - साई गाव, तालुका - पनवेल, जिल्हा-रायगड, पिन कोड - ४१०२२१, महाराष्ट्र, भारत. |
| ३. | वेबसाईटचे यूआरएल | http://www.arshiyalimited.com |
| ४. | बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील | अर्शिया एफटीडब्ल्यूझेड, गाव साई, तालुका पनवेल ४१०२२१, महाराष्ट्र |
| ५. | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | . अर्शिया लि. कंपनी फ्री ट्रेड वेअरहौसिंग झोन (एफटीडब्ल्यूझेड) पनवेल, महाराष्ट्र येथे विकासक आहे.<br>. (एफटीडब्ल्यूझेड) कामाची जागा एकूण १४३ एकर जमिनीवर पसरलेली आहे (११३ एकर फ्रीहोल्ड आणि ३० एकर कॅपिटालॅण्ड इंडिया ट्रस्टला ३० वर्षांकरिता भाडेतत्त्वावर, ज्याचे प्रत्येक वेळी ३० वर्षांनी नूतनीकरण होऊ शकते.) |
| ६. | गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/सेवांचे परिमाण आणि मूल्य | वित्तीय वर्ष २०२३ करिता लेखापरिक्षित वित्तीय विवरणपत्रानुसार, एकूण महसूल भारतीय रु. ४१.४३ कोटी (प्रचलनामधून महसूल भारतीय रु. २६.१९ कोटी आणि इतर उत्पन्न भारतीय रु. १५.२४ कोटी) |
| ७. | कर्मचारी/कामगारांची संख्या | १६-२० |
| ८. | अधिक तपशील उपलब्ध असणारे यूआरएल | http://www.arshiyalimited.com |
| ९. | संहितेच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराची पात्रता उपलब्ध असणारे यूआरएल | ठराव अर्जदार नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ च्या कलम २९ए अन्वये पात्र असावा. तपशील in_arshiyalimited_cirp@pwc.com/ cirp.arshiyalimited@gmail.com येथून ईमेलद्वारे प्राप्त करता येतील. |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांक | २८ ऑक्टोबर, २०२४ (*) खालील टीप पहावी. |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक | ४ नोव्हेंबर, २०२४ (*) खालील टीप पहावी. |
| १२. | तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | ९ नोव्हेंबर, २०२४ (*) खालील टीप पहावी. |
| १३. | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक | १४ नोव्हेंबर, २०२४ (*) खालील टीप पहावी. |
| १४. | संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मूल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक | १९ नोव्हेंबर, २०२४ (*) खालील टीप पहावी. |
| १५. | ठराव योजना सादरीकरणाचा अंतिम दिनांक | १९ डिसेंबर, २०२४ (*) खालील टीप पहावी. |
| १६. | ईओआय सादर करण्यासाठी ईमेल आयडी (अनिवार्य) | in_arshiyalimited_cirp@pwc.com / cirp.arshiyalimited@gmail.com |
| १७. | मूळ दस्तऐवज सादरीकरणाकरिता पत्ता | पीडब्ल्यूसी कार्यालय, मुंबई शिवाजी पार्क २५२, २रा-५वा मजला, वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क दादर, मुंबई - ४०००२८, महाराष्ट्र, भारत. |

(*) ७७ दिवसांच्या कालावधीचे अपवर्जन प्राप्त करण्याकरिता, माननीय एनसीएलटीसमक्ष अर्ज दाखल करण्यात आला आहे, माननीय एनसीएलटीद्वारे त्याला मंजुरी मिळण्याच्या अधीन राहून, सुधारित सीआयआरपी कालावधी दि. २० ऑक्टोबर, २०२४ पासून ०५ जानेवारी, २०२५ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

**पंकज महाजन**
**अर्शिया लिमिटेडचे ठराव व्यावसायिक**
आयबीबीआय नोंदणी क्र. IBBI/IPA-001/IP-P00836/2017-2018/11420
एएफए: AA1/11420/02/181224/106618 वैधता १८.१२.२०२४
आरपी कार्यालय पत्ता: एच-२२३, डीएलएफ कॅपिटल ग्रीन्स, १५, शिवाजी मार्ग, दिल्ली-११००१५.
पत्रव्यवहाराकरिता ईमेल: in_arshiyalimited_cirp@pwc.com/ cirp.arshiyalimited@gmail.com
सहाय्यक आयपीई: पीडब्ल्यूसी कॉर्पोरेट बिझनेस सर्व्हिसेस एलएलपी
दिनांक: १४ ऑक्टोबर, २०२४